वाचा :- १. कार्यालयीन आदेश क्रमांक ६, दि. ०३.०१.१९९७.
२. कार्यालयीन आदेश क्र. ०८, दि. १९.०३.२००२.

---

क्र.स्था-१८ /ब/ वलेअ अहवाल/ न.क्र. १८३/

**स्थानिक निधी लेखापरीक्षा,**
**संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
**सहावा मजला, कोंकण भवन.**
**नवी मुंबई. ४०० ६१४.**

**स्थायी आदेश क्र. ०९ /२०१७,** **दिनांक :-** 25 MAY 2017

विषय :- जिल्हा परिषद विभागांचे लेखापरीक्षण अहवाल निर्गमनाबाबत मार्गदर्शक सुचना.

**प्रस्तावना :-**

संचालनालयाने उपरोक्त वाचा मधील आदेश क्र. ०२ अन्वये एकात्मिक बाल विकास योजनेसाठी शासनाकडून जिल्हा परिषदेस स्वतंत्ररित्या अनुदान प्राप्त होत असल्याने व सदर अनुदानातून स्वतंत्ररित्या योजना राबविण्यात येत असल्याने सन २००१-०२ च्या लेखापरीक्षणापासून एकात्मिक बाल विकास विभागाचा लेखापरीक्षण अहवाल स्वतंत्ररित्या निर्गमित करण्याबाबत तसेच वाचा मधील आदेश क्र. ०१ नुसार महिला बालकल्याण व एकात्मिक बाल विकास या दोन्ही विभागाच्या लेखापरीक्षणासाठी जिल्हा परिषद लेखापरीक्षणाकरीता मूळ मंजुर असलेल्या ५ टक्के श्रमदिनापैकी प्रत्येकी ५० टक्के या प्रमाणे श्रमदिन विभागुन घेण्याबाबत आदेशीत केले आहे.

जिल्हा कार्यालयांनी जिल्हा परिषद विभागांचे निर्गमित केलेल्या नियमित लेखापरीक्षण अहवालांचे अवलोकन केले असता जिल्हा परिषद विभागांच्या लेखापरीक्षण अहवाल निर्गमनामध्ये एकसुत्रता दिसून येत नाही. जिल्हा परिषद विभागांचे निर्गमित करावयाच्या लेखापरीक्षण अहवालांमध्ये सर्व जिल्हा कार्यालयांमध्ये एकसुत्रता आणण्यासाठी याद्वारे खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

**आदेश :-**

अ ) राज्यातील सर्व जिल्हा परिषदांमध्ये सर्व साधारणपणे खालील प्रमाणे १३ विभाग आहेत.

१) सामान्य प्रशासन २) शिक्षण ३) ग्रामीण पाणी पुरवठा ४) आरोग्य
५) कृषी ६) पशुसंवर्धन ७) समाज कल्याण ८) लघुपाटबंधारे
९) भविष्य निर्वाह निधी १०) वित्त ११) बांधकाम १२) महिला व बालकल्याण
१३) एकात्मिक बालविकास

ब) जिल्हा परिषदेच्या उपरोक्त १३ विभागांचे नियमित लेखापरीक्षण झाल्यानंतर प्रत्येक विभागाकरीता एक स्वतंत्र अहवाल तयार करुन तो मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० मधील नियम ८ नुसार लेखापरीक्षण केल्यानंतर ३ महिन्याच्या विहित मुदतीत निर्गमित करावा.

क) जिल्हा परिषदेकडील महिला व बालकल्याण विभाग व एकात्मिक बालविकास विभाग हे दोन स्वतंत्र विभाग असल्याने त्यांचे दोन स्वतंत्र लेखापरीक्षण अहवाल तयार करुन निर्गमित करावेत.

ड) जिल्हा परिषदेकडील बांधकाम विभागांतर्गत वेगवेगळे उपविभाग (उदा. बांधकाम १, २ किंवा उत्तर, दक्षिण, पूर्व, पश्चिम) असले तरी सर्व उपविभागांचा मिळून बांधकाम विभागाकरीता एकत्रित एक लेखापरीक्षण अहवाल तयार करुन तो निर्गमित करावा.

इ) **जिल्हा परिषदेच्या सन २०१६-१७ नियमित लेखापरीक्षणापासून** उपरोक्त प्रमाणे सर्व जिल्हा कार्यालयांनी जिल्हा परिषदेच्या १३ विभागांकरिता स्वतंत्रपणे १३ लेखापरीक्षण अहवाल निर्गमित करावेत. रायगड व रत्नागिरी जिल्ह्यामध्ये लघुपाटबंधारे विभाग कार्यरत नसल्याने या जिल्ह्यांनी जिल्हा परिषदेच्या उर्वरित १२ विभागांकरिता १२ लेखापरीक्षण अहवाल निर्गमित करावेत.

सदर आदेशातील सुचनांचे काटेकोरपणे पालन होईल, याची दक्षता घ्यावी.

या आदेशाद्वारे वाचा मधील आदेश निष्कासीत करण्यात येत आहेत.

(प्रताप मोहिते)
संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
महाराष्ट्र राज्य

प्रत:-

१. सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोंकण/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर.

२. सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, --- सर्व---